CREDAI - MCHI

<u>प्रसिद्धी पत्रक</u>

# क्रेडाइ - एमसीएचआयतर्फे नव्या अध्यक्षांच्या नावाची घोषणा

*~ घर खरेदीदारांना 'अच्छे दिन' परत मिळावेत यासाठी क्रेडाइ-एमसीएचआयचे अध्यक्ष नयन शहा यांचे या अभियानात पुढचे पाऊल ~*

**बदल घडविण्यासाठीचे मुद्दे:**

- ***रिअल इस्टेट उद्योग व्यवहार्य आणि ऑपरेट करण्यास सुलभ व्हावा***
- ***सर्वांसाठी परवडणारी घरे तयार करणे***
- ***पर्यावरणदृष्ट्या, तांत्रिकदृष्ट्या आणि आर्थिकदृष्ट्या व्यवहार्यतेबद्दल शेवटच्या टप्प्यातील महत्त्वाच्या समस्या हाताळणे***
- ***अंमलबजावणी, पूर्तता, सुरुवात हा रिअल इस्टेट उद्योगासाठी मार्गदर्शक मंत्र आहे***

**मुंबई, ३१ जुलै २०१८:** रिअल इस्टेट उद्योगाच्या मुंबई आणि एमएमआर परिसरातील शिखर संस्थेचे श्री. मयूर शहा (मॅरेथॉन रिअल्टीचे प्रमुख) यांनी नवनिर्वाचित अध्यक्ष श्री. नयन शहा (मेफेअर रिअल्टीचे प्रमुख) यांच्याकडे अध्यक्षपदाच्या जबाबदारीची धुरा सोपविली. या समारंभास बँकिंग, वित्त, विधी, शासन, विकासक वर्तुळातील प्रतिनिधी आणि इतर पूरक व्यवसायांचे भागधारक उपस्थित होते.

**सन्माननीय मुख्यमंत्री श्री. देवेंद्र फडणवीस या समारंभाचे प्रमुख पाहुणे होते**. या वेळी सन्माननीय मुख्यमंत्री म्हणाले, "२०२२ पर्यंत सर्वांसाठी घरे हे सरकारचे मिशन आहे. ही कदाचित जगातील सर्वात मोठी गृहयोजना असावी. ही पार्श्वभूमी लक्षात घेता क्रेडाइ-एमसीएचआय हे सरकारच्या खांद्याला खांदा लावून करत आहे आणि बांधकाम व्यवसायासाठी धोरणे आखण्यात सक्रिय सहभागी होत आहे, हे निश्चितच प्रशंसनीय आहे. या क्षेत्रातर्फे पारदर्शकता आणण्यासाठी आणि गृह खरेदीदारांचे हित जपण्यासाठी जाणीवपूर्वक प्रयत्न करण्यात येत आहेत."

या क्षेत्रातील एक आदरणीय व्यक्तिमत्व आणि अर्थ जगतातील जागतिक स्तरावरील आदर्श असलेले **एचडीएफसीचे अध्यक्ष पद्मभूषण श्री. दीपक पारेख** या वेळी सन्माननीय अतिथी म्हणून उपस्थित होते.

या विशेष प्रसंगी श्री. दीपक पारेख यांनी रिअल इस्टेट उद्योगासमोरील आव्हाने आणि पुढील वाटचाल यावर अत्यंत प्रभावशाली भाषण केले.

महारेराचे अध्यक्ष श्री. गौतम चटर्जी आणि मुंबई महानगरपालिकेचे आयुक्त आयएएस श्री. अजोय मेहता सन्माननीय पाहुणे म्हणून उपस्थित होते. त्याचप्रमाणे एसआरए विभागाचे मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. दीपक कपूर आणि महारेराचे सदस्य श्री. विजय सतबीर सिंग यांचीही उपस्थिती होती.

या समारंभात जाहीरनामा प्रकाशित करण्यात आला. नवनिर्वाचित अध्यक्ष श्री. नयन शहा यांच्या उपस्थितीत प्रकाशित करण्यात आलेल्या जाहीरनाम्यात अंमलबजावणी, पूर्तता व प्रारंभ यांच्या आवश्यकतेसाठीची उद्दिष्टे समाविष्ट करण्यात आली आहेत. जीएसटी, रेरा, डीसीपीआर २०३४, कॉमन

डीसीआर हे उपक्रम पुढे नेण्याचा आणि वेळेवर हे सर्व उपक्रम पूर्ण करण्याचा प्रयत्न करणार असल्याची ग्वाही श्री. नयन शहा यांनी दिली.

या वेळी **क्रेडाइ-एमसीएचआयचे अध्यक्ष श्री. नयन शहा** म्हणाले, "क्रेडाइ-एमसीएचआय ही जागतिक पातळीवर प्रतिष्ठीत बांधकाम व्यवसाय व्यापार संस्था म्हणून नावारूपाला यावी, मुंबई महानगर क्षेत्रात परवडणारी व उत्तम दर्जाची घरे बांधली जावीत आणि मुंबई महानगर क्षेत्रातील जीवनमानाच्या दर्जात सुधारणा व्हावी हा माझा प्रयत्न असणार आहे. मुंबई महानगर क्षेत्रातील १५०० हून अधिक विकासकांना विविध भागधारकांशी जोडून देण्यासाठी फॅसिलिटेटर व उद्योग उत्प्रेरकाची भूमिका निभावण्याच्या मिशनची पूर्तता करण्यासाठी मी काम करणार आहे. या माध्यमातून सर्वंकष वाढ आणि विकास यासाठी एमएमआर रिअल इस्टेट उद्योग हा एक विश्वासू भागीदार होईल."

"एवढेच नव्हे तर मुंबई महानगर क्षेत्रातील रिअल इस्टेट उद्योगाच्या वतीने आम्ही विविध सरकारी आणि आंतर-सरकारी संस्था, नागरी स्थानिक संस्था, राज्य व केंद्रीय पातळीवर प्रतिनिधीत्व करू. या अत्यंत प्रतिष्ठित आणि व्यापक प्रमाणावर पसरलेल्या संस्थेचा अध्यक्ष होणे हा माझा बहुमान आहे. हा वारसा पुढे नेण्याची आणि या क्रेडाइ-एमसीएचआयच्या पक्क्या पायावर पुढील बांधकाम करणे ही माझी जबाबदारी आहे.", अशी पुष्टी त्यांनी जोडली. "सध्या या उद्योगाची जी काही कोंडी झाली आहे, त्यातून बाहेर पडण्यासाठी सर्व कार्यपद्धतींमध्ये ईओडीबी, लँड टायटलिंग ॲक्ट, यूएलसी कायदा रद्द करणे, कन्सेप्चुअल प्लॅनबाबत पर्यावरणाबाबतची ना हरकत प्रमाणपत्रे, डिफेन्स एनओसी या सर्वांची सुरुवात करण्याबरोबरच डीसीपीआर २०३४ आणि कॉमन डीसीआर हे आम्ही व्यवहार्य उत्तर देऊ.

व्हिजन २०२२ महाध्येयाचा एक भाग म्हणून व्यवस्थापकीय समितीचे सदस्य: अध्यक्ष श्री. नयन शहा, मावळते अध्यक्ष श्री. मयूर शहा, माजी अध्यक्ष धर्मेश जैन, प्रिडेंट इलेक्ट दीपक गोराडिया, उपाध्यक्ष श्री. बोमन इराणी, श्री. हरीश पडेल, श्री. नैनेश शहा, माजी सचिव श्री. डॉमनिक रोमेल, सचिव श्री. बंदिश अजमेरा, खजिनदार श्री. सुखराज नहार आणि इतर उपस्थित सदस्य विकासकांनी पारदर्शकता, बांधिलकी, प्रामाणिकपणा, न्याय, जबाबदारी आणि पालन आणि न्याय्य वागणूक या मूल्यांची शपथ घेतली.

**क्रेडाइ-एमसीएचआयचे मावळते अध्यक्ष श्री. मयूर आर. शहा** म्हणाले, "२०१७-१८ हे वर्ष केवळ क्रेडाइ-एमसीएचआयसाठीच नव्हे तर एकूण रिअल इस्टेट क्षेत्रासाठी अत्यंत फलदायक वर्ष ठरले. या वर्षी कायापालट घडवणारी अनेक ध्येय साध्य करण्यात आली. रेरा, जीएसटीपासून, ते डीपी प्लॅन २०३४, आयटीपी ड्राफ्टपर्यंत आणि क्रेडाइ एमसीएचयाच्या मुंबई महापालिका आणि इतर सरकारी संस्थांच्या भागीदारीपर्यंत या वर्षात अनेक यशस्वी घडामोडी घडल्या. क्रेडाइ एमसीएचआयच्या अध्यक्षस्थानी श्री. नयन शहा यांची निवड झाल्याने गेल्या वर्षीच्या सर्व उपक्रमांची यशस्वी वाटचाल अशाच प्रकारे पुढे होत राहील, अशी आशा आहे. त्यांचे ज्ञान, अनुभव, बारकाव्यांबाबत असलेली माहिती आणि लक्ष केंद्रीत करण्याची वृत्ती यामुळे आपण अधिकाधिक उंचीवर जाऊ आणि क्रेडाइ एमसीएचआयमधील त्यांचा कार्यकाळ उज्ज्व असेल, अशा शुभेच्छा मी त्यांना देतो.

क्रेडाइ एमसीएचआयचे **उपाध्यक्ष श्री. बोमन इराणी** यांनी आभार प्रदर्शन केल्यानंतर या कार्यक्रमाची सांगता झाली.

**<u>क्रेडाइ-एमसीएचआयबद्दल</u>**

महाराष्ट्र चेंबर ऑफ हाऊसिंग इंडस्ट्रीची (क्रेडाइ-एमसीएचआय) स्थापना १९८२ साली झाली. मुंबई आणि मुंबई महानगर क्षेत्रातील ही प्रमुख आणि मान्यताप्राप्त संघटना आहे. बांधकाम विकास क्षेत्रात काम करणाऱ्या व्यावसायिकांना क्रेडाइ-एमसीएचआय एका व्यासपीठावर आणून या उद्योगाला भेडसावणाऱ्या समस्यांचे निराकरण करते. मुंबईतील १८०० अग्रगण्य विकासकांच्या सदस्यत्वासह क्रेडाइ-एमसीएचआयने मुंबई महानगर क्षेत्रातही विस्तार केला असून, ठाणे, कल्याण-डोंबिवली, मिरा-विरार शहर, रायगड आणि नवी मुंबई येथे संघटनेची कार्यालये आहेत. मुंबई आणि मुंबई महानगर क्षेत्रातील निवासी व व्यापारी मालमत्तांच्या संघटित विकासकामांपैकी ८० टक्के कामांचे विकासक क्रेडाइ-एमसीएचआयचे सदस्य आहेत.

**For further details:**

**RSVP**

**Bienu Vaghela: 9167141962**

**Bhagyashree Khedkar: 9833189357**